50-P

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

**गोपनीय/महत्वाचे**
जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा–१/३५०/ 408

दिनांक : २१ जून, १९९९

## :- परिपत्रक क्र.–२० :-

**विषय** : पाणी पुरवठा केंद्रे, जलवाहिन्या, जलकुंभ, साठवण तलाव यांच्या सुरक्षेबाबत उपाय योजना

**संदर्भ** : दि.२४/६/९३ चे परिपत्रक क्र.मपापुवजनिमं/संकीर्ण/१०९३/केक्र ०३०/भाग-४/प्रशाना ४/४०८४

प्राधिकरणाच्या मालकीच्या तसेच नगरपरिषदांच्या मालकीच्या पण प्राधिकरणाकडून चालविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्रातील जलवाहिन्या, जलकुंभ, जलशुध्दीकरण केंद्र, साठवण तलाव इत्यादींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी, याबाबतच्या सविस्तर सूचना संदर्भीय परिपत्रकाव्दारे निर्गमित केल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत सुलभ संदर्भासाठी व अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

कारगीलमधील युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी घातपाताची शक्यता नाकारता येणार नाही. अशा स्थितीत पाणी पुरवठा केंद्रे व तत्सम कामे याबाबत विशेष सुरक्षा उपाय/व्यवस्था करणे अत्यंत जरुरीचे आहे. या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी व करावयाची उपाययोजना याबाबत सविस्तर सूचना संदर्भीय परिपत्रकाव्दारे देण्यात आल्या आहेत त्यांचे तंतोतंत पालन करावे.

पाणी पुरवठा व मलनि:सारण योजना यावर जनतेची जीवन रेखा अवलंबून असून यासाठी आपण सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे पाणी पुरवठा केंद्राच्या सुरक्षा उपाय योजनांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. या प्रकरणी कोणतीही हेळसांड अथवा दुर्लक्ष झाल्यास त्याचे दूरगामी व गंभीर परिणाम होऊ शकतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

सहपत्र : संदर्भीय परिपत्रकाची प्रत.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव(तांत्रिक)

प्रत :
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव(प्रशासन), म.जी.प्रा., मुंबई
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई
सौ.कल्पना पाण्डे, सदस्य (अशासकीय), महापौर, नागपूर महानगरपालिका
श्रीमती रेणुका मयेकर, सदस्य(अशासकीय), अध्यक्ष, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
श्री.एन.व्ही.मिरानी, सदस्य, माजी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
श्री.आशिष कुलकर्णी, सदस्य, ६४,/१४९६, आदर्शनगर, एम.आय.जी.कॉलनी, वरळी, मुंबई २५
श्री.सुनिल वाघ, सदस्य, धुळे, गट नं.५, १९४१, अ, मयुर एजन्सी, धुळे
श्री.सुनिल धांडे, सदस्य, धांडे गल्ली, बीड शहर, जि-बीड
श्री.अशोकराव दादाबा चोरमले, सदस्य, मुक्काम करोडी, पोस्ट चिंचपोट(इजदे), ता-पाथर्डी, जि-अहमदनगर
मुख्य अभियंता म.जी.प्रा. ठाणे/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ.

गोपनीय.

क्र. मपापुवजनिमं/संकीर्ण-1993/के.क्र.030/
भाग-4/प्रशाखा-4/ 4084
ग्रेयस चेंबर्स, 175, डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई - 400 001.
दिनांक :- 24-6-1993.

-: प रि प त्र क :-

विषय : पाणी पुरवठा केंद्राच्या सुरक्षिततेबाबत उपाय योजना.

मंडळाच्या मालकीच्या तसेच नगरपालिकेच्या मालकीच्या पण मंडळातर्फे चालविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्रातील पाईप लाईन, पूल व जलशुध्दीकरण केंद्र इत्यादींच्या सुरक्षितेच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी, याबाबत मध्यवर्ती कार्यालयातर्फे वेळोवेळी परिपत्रके काढून सूचना देण्यात आल्या आहेत. तरीसुध्दा मुंबई शहरात अलिकडे झालेली बॉम्बस्फोट मालिका व त्यानंतर मुंबई शहराबाहेर पसरत चाललेले लोण याचा विचार करता अशा प्रकारची घातपाताची शक्यता पाणी पुरवठा केंद्राबाबतही नाकारता येत नाही. म्हणून यासाठी विशेष सुरक्षा उपाय करणे जरूरीचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

1) पाणी पुरवठा केंद्र, पाईप लाईन, पूल, जलशुध्दीकरण केंद्र, जलकुंभ, साठवण तलाव इत्यादी ठिकाणी रात्रंदिवस जागता पहारा ठेवण्याची व्यवस्था करावी. मंडळाच्या काही केंद्रावर खाजगी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आल्या आहेत. या संस्थेचे सेवक काम करीत असताना, विश्वासास पात्र आहेत की नाहीत, इकडे लक्ष देऊन आवश्यक तर बदलून घ्यावेत. त्याचप्रमाणे स्थानिक पोलिस यंत्रणेशी संपर्क साधून सर्व महत्वाच्या कामाच्या स्थळांची माहिती द्यावी व आवश्यकतेनुसार त्यांची मदत घ्यावी.

2) ज्या केंद्राच्या परिसराला संरक्षक भिंतीचे कुंपण नसेल तिथे ते बांधण्याबाबत कार्यवाही करावी.

3) ज्या ठिकाणी एकापेक्षा जास्त प्रवेशद्वारे असतील त्या ठिकाणी एकच प्रवेशद्वार उघडे ठेवावे व तेथे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची, अथवा कामासंबंधी, पण मंडळ कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त येणाऱ्या व्यक्तींची कसून तपासणी करावी. तसेच बाहेरून येणाऱ्या अनोळखी व्यक्ती व वाहनांस पूर्णतः निर्बंध घालावेत. यासाठी प्रवेशद्वारावर चौकीदार ठेऊन त्याच्याकडे सर्व गोष्टींची नोंद ठेवणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींची काळजी केंद्राच्या शाखा अभियंत्यांनी घ्यावयाची असून त्याची जबाबदारी त्या त्या शाखा अभियंत्यावर राहील. हे काम व्यवस्थितरित्या होत आहे की नाही इकडे अधून मधून लक्ष द्यावे.

4) पाणी पुरवठा केंद्र, पाईप लाईन, पूल, जलशुध्दीकरण केंद्राचे फोन नंबर व पत्ता नजीकच्या अग्नीशमन केंद्र तसेच पोलीस स्टेशनला देऊन त्यांना केंद्राबाबतची माहिती द्यावी, जेणेकरून त्यांना मदतीसाठी सहाय्य देणे सोपे होईल. तसेच त्यांचे फोन नंबर पाणी पुरवठा केंद्रातील दूरध्वनीसमोर ठळक अक्षरात लिहून ठेवावेत.

5) ज्या केंद्रावर स्वत:ची अग्नीशमन नळकांडी अथवा अवजारे आहेत, ती अधूनमधून तपासून वापरण्याच्या स्थितीत आहेत की नाही, ते पहाणे व तसेच ते वापरण्याचे माहिती (शिक्षण) सदर केंद्रावरील कर्मचाऱ्यांना आहे का याचीही पडताळणी करावी.

6) जलशुध्दीकरण केंद्रामध्ये विशेषतः क्लोरीनेशन व फिल्टर बेड बाबतीत नेहमी सतर्क राहणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये विषारी द्रव्याचा वापर करूनही घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा ठिकाणी पाणी पुरवठा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची नजर चुकवून कुणालाही जाता येणार नाही, यांची खबरदारी घ्यावी.

7) पाईप लाईन पुलाच्या दोन्ही टोकांना ( Both Ends) प्रवेशव्दारावर चौकीदार अथवा सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावेत.

8) महाविद्यालयीन अभ्यास संदर्भात पाणी पुरवठा केंद्र तसेच जलशुध्दीकरण केंद्राला भेट देणाऱ्या संस्थाना शक्यतो सध्याच्या काळात अनुमती देऊ नये. अगदीच गरजेचे वाटल्यास संबंधीत अधीक्षक अभियंता/यांचेशी विचार विनिमय करून येणाऱ्या व्यक्तींबरोबर त्या संस्थेचे जबाबदार अधिकारी उपस्थित असतील अशी खात्री करून मगच परवानगी द्यावी.

9) पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत काळजी घेत असताना मलनि:स्सारण केंद्राबाबतीतसुध्दा योग्य दक्षता घ्याव्यात, जेणेकरून, मलनि:स्सारण वाहिन्या फुटल्याच्या दर्जावर परिणाम करणार नाहीत.

10) या परिपत्रकाची प्रत सर्व पाणी पुरवठा केंद्र, जलशुध्दीकरण केंद्र इ. वरील कर्मचाऱ्यांना माहिती होईल अशा रीतीने ठळकपणे सूचना फलकावर लावावी. तसेच वेळोवेळी सर्वांना वाचवून त्यावर त्यांच्या सह्या घ्याव्यात.

वरील प्रकारची सर्व व्यवस्था सद्यस्थितीत उपलब्ध आहे किंवा कसे, याची खातरजमा अधीक्षक अभियंता यांनी स्वतः करून तसे मध्यवर्ती कार्यालयास त्वरीत कळवावे. अधीक्षक अभियंता यांनी तुरंतच सूचना देऊन न थांबता अधूनमधून त्यांनी अचानक केंद्राना भेट देऊन सर्व व्यवस्थेची पहाणी करावी. काही वेळा रात्रीसुध्दा अचानक भेट द्यावी. जेणेकरून सुरक्षा व्यवस्थेवर वचक राहील.

पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांवर जनतेची जीवन-रेषा अवलंबून आहे. त्यासाठी आपली यंत्रणा सतर्क राहून कामे सुरळीत चालतील याकडे लक्ष देणे आपले कर्तव्य आहे. हे ध्यानांत घेऊन याकडे सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी परिपत्रकाची पोच द्यावी.

सही/-

(रा. मा. सगणे)

मुख्य अभियंता (नागरी)